आरोग्य सेवा

**आदेश**

जाक्र.जिशक/अंधत्व/ 5848 /०६
कार्यालय,जिल्हा शल्य चिकित्सक
जिल्हा रुग्णालय,उस्मानाबाद
दिनांक - २२.९.२००६

प्रति,
संचालक ,
जे.एफ. अजमेरा रोटरी नेत्र रुग्णालय. (रोटरी सेवा ट्रस्ट उस्मानाबाद द्वारा संचलित)
उस्मानाबाद .

विषय :- जे.एफ.अजमेरा रोटरी नेत्र रुग्णालयास जिल्हा अंधत्व नियंत्रण समिती अंतर्गत नेत्र शस्त्रक्रिया केंद्र म्हणून मान्यता देणे बाबत.

संदर्भ :- १) आपले दिनांक ३१.७.२००६ चे पत्र.
२) मा.जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष जिल्हा अंधत्व नियंत्रण समिती यांची दिनांक ७.९.२००६ ची मंजूर टिप्पणी .

वरील विषयास व संदर्भास अनुसरुन जे.एफ.अजमेरा रोटरी नेत्र रुग्णालयास जिल्हा अंधत्व नियंत्रण समिती ,उस्मानाबाद अंतर्गत नेत्र शस्त्रक्रिया केंद्र म्हणून खालील अटींच्या आधीन राहून मान्यता देण्यात येत आहे.

१) सदर संस्थेस खालील नमूद केलेली गावे कार्यक्षेत्र म्हणून देण्यात येत आहेत.सदर गावामध्ये आपल्या कर्मचा-यांमार्फत अंध व्यक्तींची पहाणी करुन अंध नोंद बही तयार करण्यात यावी व सदर रुग्णांवरती आपल्या रुग्णालयात शस्त्रक्रिया करण्यात याव्यात.

कार्यक्षेत्रातील गांवे :- बेंबळी , पाटोदा,केशेगांव, तेरखेडा,येडशी,खामसवाडी , समुद्रवाणी,जागजी,इटकळ ,अणदूर,जळकोट, पाडोळी.

२) मा. सहसंचालक(नेत्र) आरोग्य सेवा मुंबई यांचे दिनांक १३.३.२००६ चे मोतिबिंदू शस्त्रक्रिया पुर्व व पश्चात घ्यावयाची काळजी यां बाबत मार्गदर्शक पत्राची प्रत सोबत देण्यात येत आहे.सदर सुचनांचे काटेकोर पालन करण्यात यावे. यातून काही गुंतागुंत निर्माण झाल्यास त्याची जबाबदारी सदर संस्थेची राहील.

३) आपल्या संस्थेमध्ये मोफत करण्यात येणा-या मोतिबिंदू रुग्णांची नोंदणी व माहिती Catract Surgical Record.मध्ये करण्यात यावी. सदर नोंदी मध्ये लाभार्थिचा तात्पुरता व कायम पत्ता व्यवस्थित नोंदवावा जेणे करुन रुग्णाची फेर तपासणी करणे शक्य होईल. शस्त्रक्रिया झालेल्या रुग्णांना आपल्या मार्फत ४० दिवस पाठपुरावा करण्यात यावा.४० दिवसांचा पाठपुरावा झाल्यानंतर रुग्णांचे Catract Surgical Record जिल्हा अंधत्व नियंत्रण समितीस सादर करण्यात यावे. संस्थेस अनुदान मंजूर करताना ज्या बाबीवर संस्थेमध्ये कार्यवाही केली आहे त्याच बाबींचे अनुदान मंजूर करण्यात येईल.उदा.चष्मा वाटप, रुग्ण वाहतूक इत्यादी देय अनुदान राज्य अंधत्व नियंत्रण समितीकडून जिल्हा अंधत्व नियंत्रण समितीकडून जिल्हा अंधत्व नियंत्रण समितीस अनुदान प्राप्त झाल्यानंतर वितरीत करण्यात येईल.

४) जिल्हा अंधत्व नियंत्रण समिती सुचित करील त्या अधिका-या मार्फत आपल्या रुग्णालयाची व रुग्ण नोंदणीची वेळोवेळी तपासणी करण्यात येईल.

जिल्हा शल्य चिकित्सक
तथा उपाध्यक्ष
जिल्हा अंधत्व नियंत्रण समिती,
उस्मानाबाद